सकाळ पिंपरी-चिंचवड
सोमवार, १८ डिसेंबर २०२३

# औषधनिर्माण व आयुर्वेदाचे मार्गदर्शन

■ सिद्धांत दोशी (आरएमडी कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)



श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी यांच्यातर्फे चाकण येथील कॅलिडस रिसर्च लॅबोरेटरी येथे प्रथम वर्ष डिप्लोमा फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते. उत्पादन विभागप्रमुख अभिजित पाटील यांनी विद्यार्थ्यांना उद्योगातील सर्व उपकरणांची माहिती दिली. गुणवत्ता नियंत्रण विभागप्रमुख प्रशांत जांभळे यांनी तयार केलेल्या औषधाचे विश्लेषण कसे करायचे? याची माहिती दिली. स्वाती ढगे आणि कल्याणी भालेकर यांनी कॅलिडस संशोधन प्रयोगशाळेचे संचालक वर्धमान बाफना यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. दरम्यान, अजमेरा पिंपरी येथील अक्षय आरोग्यम आयुर्वेदिक औषधालय आणि पंचकर्म केंद्रात आयुर्वेदिक फार्मसीची माहिती घेतली. राहुल खोमणे यांनी औषधे व तेथील कामाची माहिती दिली. अक्षय मालशिखरे यांनी पंचकर्माचे महत्त्व सांगितले. प्रा. सुचिता खोत आणि प्रा. रेश्मा मिंढे यांनी खोमणे व आणि डॉ. माळशिखरे यांचे आभार मानले. प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश धारिवाल, कार्याध्यक्ष शांतिलाल लुंकड, मानद सरचिटणीस ॲड. राजेंद्रकुमार मुथा, कोषाध्यक्ष प्रकाशचंद चोपडा यांचे मार्गदर्शन लाभले.

PRINCIPAL
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune-411 019